**<u>ठळक बातम्या</u>**

- ७६व्या प्रजासत्ताक दिन सर्वत्र उत्साहात साजरा/ राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नवी दिल्लीत ध्वजारोहण संपन्न

- परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यात आणि इतर सर्वच बाबतीत महाराष्ट्र आघाडीवर असल्याचं राज्यपालांचं प्रतिपादन

- मुंबई किनारी रस्त्याच्या उत्तर वाहिनीचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

- ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेच्या पुरुष एकेरीत इटलीच्या यानिक सिनरनं सलग दुसऱ्यांदा पटकावलं विजेतपद

**आणि**

- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत, नाशिक इथं झालेल्या सामन्यात आज महाराष्ट्राचा बडोद्यावर ४३९ धावांनी दणदणीत विजय / दुसऱ्या डावात सौरभ नवलेच्या नाबाद १२६ धावा, ठरला सामन्यातला उत्कृष्ट खेळाडू

**<><><><><>**

७६वा प्रजासत्ताक दिन आज सर्वत्र उत्साहानं देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. नवी दिल्लीच्या कर्तव्यपथावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी तिरंगा ध्वज फडकावला. देशाच्या सामरिक सज्जतेचं, आणि सांस्कृतिक परंपरेचं समृद्ध दर्शन घडवणाऱ्या संचलनाची मानवंदना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्वीकारली. देशाची विविधता आणि सांस्कृतिक एकात्मता दाखवणारे १६ विविध राज्यांचे तसंच इतर मंत्रालयांचे मिळून ३१ चित्ररथही संचलनात सहभागी झाले

होते. इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रबोवो सुबियंतो या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. **स्वर्णिम भारत - विरासत और विकास** ही यंदाच्या संचलनाची संकल्पना होती.

या सोहळ्यापूर्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शहीद स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करुन आदरांजली वाहिली.

देशात सर्वत्र प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजवंदनेचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावर देशवासीयांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. प्रजासत्ताक देश म्हणून भारत ७५ वर्षांचा प्रवास पूर्ण करत आहे, असं सांगून राज्यघटना तयार करणाऱ्या सर्वांना त्यांनी अभिवादन केलं. भारताचा हा प्रवास लोकशाही, प्रतिष्ठा आणि एकता या तत्त्वांच्याच आधारावर झालेला आहे, असं प्रधानमंत्र्यांनी नमूद केलं. या निमित्ताने राज्यघटनेच्या मूल्यांची जपणूक करण्याची आणि एक कणखर आणि समृद्ध भारत घडवण्याची प्रेरणा आपल्याला मिळेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यात आणि इतर  सर्वच बाबतीत महाराष्ट्र आघाडीवर असल्याचं राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. ७६व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आज मुंबईत शिवाजी पार्क मैदानावर आयोजित मुख्य शासकीय सोहळ्यात ते बोलत होते. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करुन सरकारी कामकाज अधिक गतिमान करता येईल, असं ते म्हणाले. लोककल्याणाच्या विविध योजना येत्या १०० दिवसात लागू करण्याचे निर्देश दिले आहेत असं ते म्हणाले.

राज्यपालांच्या हस्ते यावेळी ध्वजारोहण करण्यात आलं. त्यानंतर राज्य पोलीस दल आणि इतर सुरक्षा दलांच्या संचलनाची मानवंदना राज्यपालांनी स्वीकारली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, दक्षिण ऑस्ट्रेलिया राज्याचे व्यापार आणि गुंतवणूक मंत्री जो झेकॅक्स, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, विविध देशांचे मुंबईतले वाणिज्यदूत आणि इतर मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

राज्यपालांनी मुंबईत राजभवनातही राष्ट्रध्वज फडकावून ध्वजाला मानवंदना दिली. विधान भवनात विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी तिरंगा फडकावला. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानमंडळ सचिवालयाचे अधिकारी- कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी वर्षा या त्यांच्या शासकीय निवासस्थानी राष्ट्रध्वज फडकावून मानवंदना दिली. यावेळी पोलीस दलाच्या पथकानं राष्ट्रध्वजाला सलामी दिली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज ठाण्यात झालेल्या ध्वजवंदनेच्या कार्यक्रमात उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पुण्यात ध्वजारोहणाचा मुख्य कार्यक्रम झाला. मुंबई शहर आणि उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयातही ध्वजवंदनाचा कार्यक्रम झाला. मुंबई उपनगर जिल्ह्याच्या कार्यक्रमात क्रीडा क्षेत्रात नैपुण्य मिळवलेले खेळाडू आणि शिक्षकांचा सत्कार केला गेला. शहीद जवानांच्या वीर माता आणि कुटुंबीयही या कार्यक्रमाला उपस्थित होते.

मोहिमांवर असलेल्या नौकांसह वेस्टर्न नेव्हल कमांडच्या सर्व तुकड्यांनीही प्रजासत्ताकदिन साजरा केला.

पश्चिम रेल्वे मुख्यालयात पश्चिम रेल्वेचे महाव्यवस्थापक अशोक कुमार मिश्र यांच्या हस्ते, तर मध्य रेल्वेच्या मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इथल्या

मुख्यालयात झालेल्या कार्यक्रमात मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धर्मवीर मीणा यांच्या हस्ते ध्वजवंदन झालं.

प्रजासत्ताक दिना निमित्त आकाशवाणी मुंबई केंद्राच्या आवारातही केंद्राचे उपमहासंचालक संजय बोदेले यांच्या हस्ते ध्वजवंदन झालं.

**नागपूर** मधे कस्तुरचंद पार्क इथं प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्य कार्यक्रम झाला. याप्रसंगी विविध पथकांचं पथसंचलन झालं. नागपूर शहराच्या विकासाचा वेग कायम राहून हे शहर आंतरराष्ट्रीय होईल, असं पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यावेळी म्हणाले.

७६वा प्रजासत्ताक दिन आज **पुणे** शहर आणि जिल्ह्यात उत्साहात साजारा झाला. उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी शिवाजीनगर इथल्या पोलीस कवायत मैदानात ध्वजवंदन केलं. गेल्या ७५ वर्षात देशासमोर अनेक संकटं आली, परंतु देश कुणापुढे झुकला नाही. डगमगला नाही. भक्कम उभा राहीला, असं अजित पवार यावेळी म्हणाले.

**छत्रपती संभाजीनगर** जिल्ह्याचा मुख्य शासकीय सोहळा पोलीस आयुक्तालयाच्या देवगिरी मैदानावर मोठ्या पार पडला. सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

राज्यात इतरत्रही मोठ्या उत्साहात साजरा झाला. विविध जिल्हा मुख्यालयांमधे पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं.

**<><><><><>**

धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्त्याच्या उत्तर वाहिनीचं लोकार्पण आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते झालं. किनारी रस्त्यामुळे मुंबईकरांचा प्रवासाचा वेळ आणि इंधन यात मोठी बचत होणार असून प्रदूषण कमी करण्यात हा मार्ग महत्त्वाची भूमिका बजावेल, असं मुख्यमंत्री

यावेळी म्हणाले. मुंबई किनारी रस्त्याच्या उत्तरवाहिनी मार्गासह इतर तीन आंतरमार्गिका उद्यापासून वाहतुकीसाठी खुल्या होणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, तसंच मंत्री आशीष शेलार, मंगल प्रभात लोढा, आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेच्या पुरुष एकेरीचं जेतेपद इटलीच्या यानिक सिनरनं सलग दुसऱ्यांदा पटकावलं आहे. त्यानं जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेव्ह याच्यावर ६-३, ७-६, ६-३ अशी सहज मात केली. २ तास, ४२ मिनिटं चाललेल्या या सामन्यावर सिनरनं सुरुवातीपासूनच वर्चस्व गाजवलं. त्याला एकाही ब्रेक पॉइंटचा सामना करावा लागला नाही. २३ वर्षीय यानिक सिनरचं ते तिसरं ग्रॅन्डस्लॅम अजिंक्यपद आहे. यापूर्वी त्यानं २०२४मध्ये ऑस्ट्रेलियन ओपन आणि यूएस ओपनचं जेतेपद पटकावलं होतं.

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत, नाशिक इथं झालेल्या सामन्यात आज महाराष्ट्रानं बडोद्यावर ४३९ धावांनी दणदणीत विजय मिळवला. महाराष्ट्रानं पहिल्या डावात, २९७ धावा केल्या होत्या, तर बडोद्यानं १४५ धावा केल्या. दुसऱ्या डावात ७ बाद ४६४ धावांवर महाराष्ट्रानं आज आपला डाव घोषित केला. सौरभ नवलेनं नाबाद १२६ धावा केल्या. रामकृष्ण घोषचं शतक थोडक्यात हुकलं. त्यानं ९९ धावा केल्या. कर्णधार ऋतुराज गायकवाडनं ८९ धावांचं योगदान दिलं.

महाराष्ट्राच्या पहिल्या डावातल्या आघाडीमुळे बडोद्यापुढं विजयासाठी ६१६ धावांचं आव्हान होतं. ते बडोद्याला पेलता आलं नाही. अजीत शेठनं सर्वाधिक ५१, तर ज्योत्स्नील सिंगनं ४० धावा केल्या. इतर फलंदाजांना चांगली कामगिरी करता

आली नाही. त्यामुळे बडोद्याचा दुसरा डाव १७७ धावात आटोपला. महाराष्ट्रातर्फे मुकेश चौधरीनं ५, रजनीश गुरबानीनं ३, तर रामकृष्ण घोषनं २ गडी बाद केले.

पहिल्या डावात ८३ तर दुसऱ्या डावात नाबाद १२६ धावा करणारा, तसंच दोन्ही डावात मिळून पाच झेल घेणारा सौरभ नवले सामन्यातला उत्कृष्ट खेळाडू ठरला.

**<><><><><>**

आयसीसी १९ वर्षांखालच्या महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेत आज क्वालालंपूर इथं झालेल्या सामन्यात भारतानं बांगलादेशावर ८ गडी राखून विजय मिळवला.

भारतानं नाणेफेक जिंकून बांग्लादेशाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं, आणि उत्तम गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण करत त्यांच्या फलंदाजीला लगाम घातला. बांगलादेशानं निर्धारित २० षटकात ८ गडी गमावून ६४ धावा केल्या. भारतातर्फे वैष्णवी शर्मानं ३ बळी मिळवले.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला १३९ पद्म पुरस्कारांची घोषणा केली. त्यात ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांनाही पद्मश्री जाहीर झाल्याबद्दल, आकाशवाणीशी बोलताना त्यांनी आनंद व्यक्त केला….

**बाईट- अशोक सराफ**

**<><><><><>**

मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काल दिवसभरात किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत वाढ झाली. येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**